# व्यावसायिक नीतिमूल्य

सादरकर्ते
गायकवाड ज्योती सुरज
वाणिज्य विभाग

# व्यावसायिक नीतिमूल्य


- नीतिमूल्य यास इंग्रजीत इथिक्स म्हणतात. इथिक्स हा शब्द एथॉस या ग्रीस शब्दावरून तयार झाला.  या शब्दाचा अर्थ जगण्याचा मार्ग असा होतो. म्हणून नीती मूल्य ही तत्त्वज्ञानाची शाखा असून तिचा मानवी आचरणाशी संबंध आहे. मानवाने समाजात जगताना आचरणात आणावयाचा नियमांचा समावेश नीतिमूल्य या संकल्पनेत होतो. नीती मूल्ये आपल्या नैतिक निवाड्यांना बौद्धिक समर्थन पुरविते. नैतिकदृष्ट्या योग्य आणि अयोग्य , न्याय आणि अन्याय काय ? याचा अभ्यास नीती मूल्यात होतो. व्यक्तींनी परस्परांशी अंतरक्रिया कशा साधाव्यात ? याचे स्पष्टीकरण नीतिमूल्य देतात. व्यक्तीस चांगले बनविणे ,समाजात चांगले बनविणे व त्याद्वारे संपूर्ण मानव जातीत चांगले बनविणे हा नीती मूल्यांचा उद्देश असतो . थोडक्यात चांगले काय आणि वाईट काय हे ठरविण्यासाठीची आदर्श मानके म्हणजे नीतिमूल्य होत .

# व्याख्या

'मानवी वर्तनात चांगले काय आणि वाईट काय याचा अभ्यास ‘

' मानवी जीवनातील आदर्श गुंतवणुकीचे शास्त्र '

# नीती मूल्यांचे स्वरूप



# स्वरूप

- १) पद्धतशीर ज्ञान -
- पद्धतशीर ज्ञान हा नीती मूल्यांचा हेतू असल्याने नीतिमूल्य हे शास्त्र आहे . प्रत्येक शास्त्र हे विशिष्ट स्वरूपाचे असते . त्याचप्रमाणे शास्त्र म्हणून नीती मूल्यांचे देखील एक विशिष्ट क्षेत्र आहे . नीती मूल्य ही मानवी आचरणाचा निवडा करण्याची संबंधित आहेत . नीती मूल्यांचा संबंध हा मानवी वर्तनाच्या चांगलेपणाचे व वाईटपणाचे पद्धतशीर स्पष्टीकरण देण्याची आहे .

- २) आदर्शात्मक शास्त्र -
- नीती मूल्य ही आदर्शात्मक शास्त्र आहे . यात सध्या स्थिती पेक्षा वेगळे काय करता येईल याचे स्पष्टीकरण दिले जाते . त्यामुळे ते नैसर्गिक शास्त्रापेक्षा वेगळे आहे . नैसर्गिक शास्त्राचा संबंध काय आहे ? याच्याशी असतो . याउलट नीती मूल्यांचा संबंध काय असावे याच्याशी असतो . त्यामुळे नीती मूल्यांमध्ये तथ्यापेक्षा मूल्य या घटकास अधिक महत्त्व दिले जाते . नीती मूल्यांचा संबंध हा मानवी कृती योग्य आहे की अयोग्य याबाबतचा निवाडा देण्याची असतो .

- ३) काल्पनिक स्वरूप-
- नीतिमूल्य हे व्यावहारिक शास्त्र नाही . कारण व्यवहारिक शास्त्राचा संबंध हा तर्कशी असतो .व्यवहारीक शास्त्रामध्ये कुठल्याही गोष्टीचे कारण शोधले जाते व त्यावरील उपाय स्पष्ट केले जातात . मात्र नीती मूल्ये ही काल्पनिक स्वरूपाची असल्याने त्यात केवळ चांगले काय असावे ? याचाच विचार होतो . ते प्रत्यक्ष व्यवहारात कसे आणता येईल याची मार्ग सांगितले जात नाही .
- ४) स्वाभाविक स्वरूप-
- नीती मूल्य ही कला नाही . कारण नैतिक जीवनाची प्राप्ती कशी करायची हे नीतिमूल्ये शिकवत नाही . तर नीती मूल्य ही चांगले काय आणि वाईट काय हे ठरवण्यासाठी मदत करतात . शास्त्राप्रमाणेच कलादेखील उद्देश पूर्तीचे साधन असते. नीती मूल्ये मात्र आदर्श मानवी जीवन प्राप्त करण्याचे साधन नाही . म्हणजेच नीती मूल्य हे व्यवहारिक शास्त्र नाही आणि कला देखील नाही . त्यामुळे नीतिमूल्ये हीच स्वाभाविक स्वरूपाची असतात .

# व्यावसायिक नीतिमूल्य

- व्यावसायिक नीती मूल्य म्हणजे अशी तत्वे, पद्धती आणि तत्त्वज्ञान की जे व्यवसायिक लोकांना दैनिक व्यवहारात व्यवसायिक निर्णय घेताना मार्गदर्शन करतात . व्यावसायिक नीती मूल्य ही व्यावसायिकाच्या व्यवसायिक परिस्थितीतील वर्तणुकीशी संबंधित आहेत . व्यावसायिक नीती मूल्यांचा संबंध अशा मुद्द्यांशी असतो की जे कायद्यात समाविष्ट नसतात. व्यावसायिक कृती योग्य की अयोग्य याबाबत जेव्हा कायदा स्पष्टीकरण देत नाही , तेव्हा व्यावसायिक नीती मूल्यांचा आधार घ्यावा लागतो व त्याद्वारे कृतींबाबतचा निर्णय दिला जातो .

# व्याख्या

- “व्यावसायिक नैतिकता म्हणजे नैतिक तत्त्वांचे, आचारसंहितेचे शास्त्र . यात नीतिमान वर्तणुकीतील सर्व गोष्टींचा समावेश होतो. “
- “ व्यवसायांच्या सर्व क्षेत्रात त्याचप्रमाणे इतर व्यवसायांच्या व समाजाच्या संदर्भात व्यावसायिकाच्या वर्तणुकीमधील प्रामाणिकता म्हणजे व्यवसायिक नैतिकता. “

# व्यावसायिक नीती मूल्यांची गरज

- ग्राहकांचा विश्वास संपादन करणे व वाढविणे
- टाळणे आणि ग्राहकांना संरक्षण व्यापारातील गैरव्यवहार देणे
- ग्राहक हक्कांचे संरक्षण करणे
- व्यवसायाची प्रतिमा उजळ राखणे
- सर्व संबंधितांचे हित सांभाळणे
- सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे

# गरज

- १. ग्राहकांचा विश्वास संपादन करणे व वाढविणे-
- पैसे देऊन विकत घेतलेल्या वस्तूंची किंमत ,उपयुक्तता ,दर्जा आणि विश्वस्तता याबाबत ग्राहकाला सतत विश्वास वाटणे महत्त्वाचे आहे .व्यापारी नीती मूल्यांचे पालन हा असा विश्वास संपादन करण्याचा आणि वाढविण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे .
- २. टाळणे आणि ग्राहकांना संरक्षण व्यापारातील गैरव्यवहार देणे-
- मानवी स्वभाव वैशिष्ट्यांमुळे अनेकदा गैरप्रकार करून नफा वाढविण्याचा प्रयत्न व्यावसायिकांकडून होऊ शकतो .नीती मूल्यांचे पालन केल्याने आपोआपच अशा गैरप्रकारांना वचक बसतो आणि ग्राहकांना संरक्षण मिळू शकते .

- ३. ग्राहक हक्कांचे संरक्षण करणे-
- घटनेनुसार सर्व ग्राहकांना काही मूलभूत हक्क प्राप्त झाले आहेत. व्यावसायिक नीती मूल्यांचे पालन केल्याने हे हक्क अबाधित राहू शकतात आणि त्याद्वारे एक प्रकारे समाज कल्याणही साधले जाते .
- ४. व्यवसायाची प्रतिमा उजळ राखणे-
- कष्टाने उभ्या केलेल्या व्यवसायाचे नाव व प्रतिष्ठा चिरकाल राहावी यासाठी व्यावसायिक नीती मूल्य महत्त्वाचे आहेत.

- ५. सर्व संबंधितांचे हित सांभाळणे-
- व्यवसायामध्ये कर्मचारी, भागधारक स्पर्धक ,व्यापारी पुरवठादार अशा अनेकांशी संबंध येत असतात .व्यवसायिक नीतिमूल्य सांभाळून सर्व संबंधितांचे हित जोपासणे ही व्यवसायाची एक जबाबदारी समजली पाहिजे.
- ६. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे-
- ग्राहकांना वाजवी किमतीमध्ये चांगल्या दर्जाचा माल किंवा सेवा पुरेशा प्रमाणात आणि वेळेवर उपलब्ध करून आपण समाजाची एक प्रकारे सेवाच करत असतो हे व्यवसायिकाने लक्षात ठेवणे गरजेचे असते . नीती मूल्यांची कदर केल्याने ही जाणीव आपोआपच निर्माण होते .

# व्यावसायिक नीती मूल्यांची तत्वे

- साध्य आणि साधनांबाबतचे पावित्र्य
- दुष्ट मार्गाचा वापर करू नये
- प्रमाणबद्धतेचे तत्व
- वाईट गोष्टींची असहकार्य
- इतरांशी सहकार्य
- प्रसिद्धी
- वैश्विक मूल्य
- मानवी प्रतिष्ठा
- अहिंसा
- किफायतशीर किंमत

# तत्वे

- १. साध्य आणि साधनांबाबतचे पावित्र्य-
- व्यवसायांद्वारे वापरली जाणारी साधने व त्यांची साध्य हे नेहमी पवित्र आणि शुद्ध असले पाहिजे .म्हणजेच अयोग्य साधनांच्या आधारे योग्य साध्य प्राप्त करू नये .अयोग्य साधनांचा वापर समाजासाठी फायदेशीर असला तरी त्यांचा वापर व्यवसायांनी करू नये.
- २. दुष्ट मार्गाचा वापर करू नये-
- व्यवसायांनी दुष्ट मार्गाचा अवलंब करणे हे नैतिक असते. त्यामुळे साध्य आणि ते प्राप्त करण्याचे मार्ग याबाबत व्यावसायिकांनी कुठलाही दुष्टपणा करू नये.

- ३. प्रमाणबद्धतेचे तत्व-
- प्रमाणबद्धतेचे तत्व असे सुचित करते की, व्यवसायांनी कोणती कृती अशा प्रकारे निर्धारित करावी की ज्यातून कोणालाही तोटा होणार नाही किंवा हानी पोहोचणार नाही. म्हणजेच प्रत्येक कृती प्रमाणबद्ध स्वरूपाची असावी.
- ४. वाईट गोष्टींची असहकार्य-
- वाईट गोष्टी किंवा कृती करणाऱ्यांसोबत व्यवसायांनी सहकार्य करू नये .तर त्यांच्याशी असहकार्याची भावना ठेवावी.
- ५. इतरांशी सहकार्य-
- या तत्त्वानुसार जेव्हा इतर सहकार्य करण्यासाठी पात्र असतात, तेव्हा त्यांच्याशी व्यवसायांनी निश्चित सहकार्य करावे .

- ६. प्रसिद्धी-
- आपण जे काही करणार आहोत किंवा करत आहोत त्याचे सर्वांना ज्ञान असले पाहिजे .यातून अनैतिक कृती न करण्याची इतरांना संधी प्राप्त होत असते.
- ७. वैश्विक मूल्य-
- या तत्त्वानुसार व्यवसायांचे आचरण हे वैश्विक मूल्यांवर आधारित असावे संकुचित स्वरूपाचे मूल्य त्यांनी स्वीकारू नये .
- ८. मानवी प्रतिष्ठा-
- या तत्त्वानुसार माणूस हा उत्पादनाचा घटक आहे या स्वरूपात त्याच्याशी वागणूक करू नये. तर मानवी प्रतिष्ठाची जोपासना करावी.

- ९. अहिंसा-
- व्यवसाय जर समाजाचे हितसंबंध आणि हक्क यांना बाधा पोहोचवीत असतील तसेच स्वतःच्या हितसंबंधासाठी ग्राहकांची पिळवणूक करत असतील तर अशी कृती हिंसात्मक आणि अनैतिक ठरेल.
- १०. किफायतशीर किंमत-
- उद्योग व्यवसायांनी वस्तूंच्या किमती अशा प्रकारे निर्धारित कराव्यात, की जेणेकरून ग्राहकांना पैशाच्या बदल्यात समाधान प्राप्त होईल .

# व्यावसायिक नीती मूल्यांची व्याप्ती

- १. समाज-
- विविध संस्थांनी घेतलेल्या निर्णयांचा समाजावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. समाजाच्या गरजा भागविणे हे व्यवसायिक संस्थांचे कर्तव्य आहे .संस्थेने समाजाला बराच फायदा व्हावा या उद्देशाने निर्णय घेतले पाहिजेत तसेच नैतिकदृष्ट्या योग्य निर्णय घेऊन समाजावर अनुकूल प्रतिक्रिया होतील अशा कृती करणे हे या पातळीवरील कार्य आहे.
- २. भागधारक –
- एखाद्या संस्थेच्या निर्णयामुळे पुरवठादार ,ग्राहक ,समभागधारक ,रोखे धारक अशा सर्व व्यक्तींवर परिणाम होतो .व्यवसायिक नैतिकतेमधून संस्थेसाठी त्याचप्रमाणे हितसंबंधितांनी परस्पर व्यवहार करण्यासाठी काही नियम स्पष्ट होतात . बऱ्याच प्रकारची उदाहरणे देता येतील . कंपनीने आपल्या उत्पादकांपासून काही बाधक परिणाम होणार असतील तर ते स्पष्ट करावेत . त्याचप्रमाणे ग्राहकांना सेवा पुरविणे , जाहिरात करणे, किंमत ठरविणे यांनाही व्यावसायिक नैतिकता असावी.
-

- ३. अंतर्गत धोरणे-
- तिसरी पातळी म्हणजे अंतर्गत धोरण. कर्मचारी व व्यावसायिक संस्था यातील परस्पर संबंध या विषयात येतो .कामाच्या ठिकाणची प्रत्यक्ष परिस्थिती चांगली नसेल तर नीती धैर्य खाली येते .व्यवसायिकांनी कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी व सुरक्षिततेसाठी आवश्यक सुख सोई निर्माण करायला हव्यात . कायद्यामध्ये अशा सुविधांचा दर्जा कसा असावा याबाबतच्या तरतुदी दिलेल्या असतील तर व्यवसाय संस्थांनी नैतिकदृष्ट्या या तरतुदींचा विचार करून परिस्थितीनुसार प्रतिसाद द्यायला हवा.
- ४. व्यक्तिगत पातळी-
- चौथी पातळी म्हणजे व्यक्तिगत पातळी . संस्थेमध्ये एकमेकांशी वागणूक कशी असावी याविषयी मार्गदर्शन होते . प्रत्येकाचे आपल्या संस्थेबद्दल, वरिष्ठांबद्दल ,सहकाऱ्यांबद्दल व कनिष्ठा बद्दल काय कर्तव्य आहे यासंबंधी या पातळीचा विचार होतो .

# व्यावसायिक नीती मूल्यांची उद्दिष्टे

व्यवस्थापनासाठी उद्दिष्टे → कर्मचाऱ्यांसाठी उद्दिष्टे → ग्राहकांसाठी आणि समाजासाठी उद्दिष्टे

# व्यवस्थापनासाठी उद्दिष्टे

- १. चांगली प्रतिमा निर्माण करणे-
- सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून संस्थेची समाज माणसात एक चांगले प्रतिमा निर्माण करणे.
- २. कर्मचाऱ्यांकडून सहकार्य प्राप्त करणे-
- नीती मूल्यांचे पालन करणाऱ्या व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांच्या सहकार्यांचे आणि समर्थनाचे उद्दिष्ट सहज साध्य करता येते.
- ३. व्यवसायाचा विस्तार करणे- आपल्या व्यवसायाचे चांगले नाव राखून भरभराट करणे हे व्यवस्थापनाचे एक मुख्य उद्दिष्ट असते.
- ४. ग्राहकांना उत्तम सेवा देणे-
- वाजवी दरात चांगल्या दर्जाचा म **देण्यासाठी उत्तम व्यवस्थापन राखणे या उद्दिष्टाने नीती मूल्याचे पालन केले जाते.

# कर्मचाऱ्यांसाठी उद्दिष्टे

- १. उचित वेतन व सवलती देणे-
- कर्मचाऱ्यांनी मन लावून काम करावे यासाठी संस्थेनेच नीती मूल्यांचे पालन केले तर ते महत्त्वाचे ठरते.
- २. कर्मचाऱ्यांना न्याय देणे –
- कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता कर्मचाऱ्यांना न्याय देणे हे व्यावसायिक नीतिमत्तेचे पालन करण्यामागील एक उद्दिष्ट म्हणता येईल.
- ३. नफ्यामध्ये कर्मचाऱ्यांना सहभागी करणे-
- प्रगतशील व्यवसायांमध्ये नीती मूल्यांचा एक भाग म्हणून संस्थेला होणाऱ्या नफ्यात कर्मचाऱ्यांनाही योग्य तो वाटा दिला जातो आणि हे उद्दिष्ट ठेवूनच व्यवसाय चालविला जातो .भारतातील महत्त्वाच्या माहिती तंत्रज्ञान संस्थांनी हे उद्दिष्ट संस्थे समोर ठेवल्याचे दिसून येते.
- ४. कर्मचाऱ्यांना प्रतिष्ठेने वागविणे-
- कर्मचाऱ्यांचा आत्मसन्मान न दुखविता त्यांच्याकडून काम करून घेणे हेही एक व्यावसायिक नीती मूल्यांच्या पालनामागील उद्दिष्ट ठरू शकते .

# ग्राहकांसाठी आणि समाजासाठी उद्दिष्टे

- १. ग्राहक संरक्षण-
- उचित व्यापारी व्यवहारांमागे ग्राहकांना वस्तू किंवा सेवेचा दर्जा, किंमत आणि उपलब्धी बाबत संरक्षण देणे हे उद्दिष्ट असते .
- २. पिळवणूक टाळणे-
- नीती मूल्यांचे पालन करण्यामागे ग्राहकांची कोणत्याही पद्धतीने पिळवणूक रोखणे हे एक अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट असते.
- ३. ग्राहकांचे समाधान-
- ग्राहकांचे समाधान हाच व्यवसायाचा नफा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अनेक कंपन्या व्यावसायिक नीती मूल्यांचे पालन करतात .
- ४. गैरप्रकार टाळणे –
- संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे व्यापारी गैरप्रकार घडू नयेत आणि त्याद्वारे ग्राहकांनी नुकसान होऊ नये असे प्रत्येक व्यवसायिकीला वाटत असते. त्यामुळे हे उद्दिष्ट समोर ठेवून व्यवसाय मध्ये मूल्यांचे पालन करणे महत्त्वाचे ठरते.

# आभार